# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Head Office, Ground Floor,Ulhasnagar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra
Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र.उमपा/कर विभाग/यु.२/४६/२४
दि. ०८ / ८ /२०२४

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचितील प्रकरण ८ मधील नियम २० अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमिनी यावरील कर निर्धारण विरुद्ध संबंधीत व्यक्तीने अभिवेदन केल्यावर कर आकारणी पुस्तकात सुधारणा करण्याचे तरतुदीप्रमाणे श्री. जोगींदरसिंग असुदा सिंग लबाना, पत्ता - बॅरेक नं. ३६९ समोर, पोरशन, उल्हासनगर १ यांनी दि. ०४/०४/२०२४ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत कर पात्र मालमत्ता क्र. १४बीआय०१५६७३३०० (जुना क्र. १४/१८२९), व १४बीआय०१५६३११०० (जुना क्र. १४/०४४७) चे कर आकारणी विरुद्ध खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

**विषय -** मालमत्ता क्र. १४बीआय०१५६७३३०० (जुना क्र. १४/१८२९) व १४बीआय०१५६३११०० (जुना क्र. १४/०४४७) या दोन्ही मिळकती एकत्रीत करुन एकच बिल मिळणेबाबत.

**श्री. जोगींदरसिंग असुदा सिंग लबाना** यांनी दाखल केलेली हरकत व कार्यालयीन अहवाल पाहता पुस्तुत प्रकरणी निर्णयासाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात.

१. संदर्भित मालमत्ता क्र. १४बीआय०१५६७३३०० (जुना क्र. १४/१८२९) व १४बीआय०१५६३११०० (जुना क्र. १४/०४४७) या दोन्ही मिळकती एकत्रीत करुन एकच बिल मिळणेबाबत.
२. आदेश काय ?

**उक्त मुद्यांबाबत माझे निष्कर्श खालीलप्रमाणे आहेत.**

१. संबंधीत विभागाचे कर निरीक्षक यांनी संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असुन त्याचा कार्यालयीन अहवाल दि. ०७/०८/२०२४ प्रमाणे सदर मिळकती लगत असुन कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणून एकाच व्यक्तीच्या नावे नोंद असल्याचे आढळुन आले आहे. व एकच प्रवेशद्वार असुन सदर मिळकत ही निवासी आहे. त्यामुळे मालमत्ता क्र. १४बीआय०१५६७३३०० (जुना क्र. १४/१८२९) व १४बीआय०१५६३११०० (जुना क्र. १४/०४४७) या दोन्ही मिळकती एकत्रीत अशी नोंद करुन एक बिल करणेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

सबब, संबंधीत कर निरीक्षक यांचे अहवाल पाहता मालमत्ता क्र. १४बीआय०१५६७३३०० (जुना क्र. १४/१८२९) व १४बीआय०१५६३११०० (जुना क्र. १४/०४४७) या दोन्ही मिळकती एकत्रीत करुन एक बिले अशी नोंद करुन सदर मिळकतीचे करयोग्य मुल्य प्रथम वर्ष कर आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०२४-२५ पासुन निश्चित करणे उचित वाटते.

२. अंतिम आदेशप्रमाणे

## आदेश

१) आक्षेप मान्य

२) संदर्भित मालमत्ता क्र. १४बीआय०१५६७३३०० (जुना क्र. १४/१८२९) व १४बीआय०१५६३११०० (जुना क्र. १४/०४४७) या दोन्ही मिळकती एकत्रीत करुन एक बिल अशी नोंद करुन सदर मिळकतीचे करयोग्य मुल्य प्रथम वर्ष कर आकारणी परिसरातील प्रचलित वाजवी दरानुसार वर्ष २०२४-२५ पासुन निश्चित करुन सुधारीत देयक जारी करावे.

08/08

(निलेश चंद्रकांत कदम)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
१) श्री. जोगींदरसिंग असुदा सिंग लबाना, पत्ता - बॅरेक नं. ३६९ समोर, पोरशन, उल्हासनगर १
२) ~~मे कोल्ब्रो ग्रुप, नागपूर यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी~~

प्रत : कर निरीक्षक, युनिट क्र. २, उ.म.५२